# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ११९/२०२०

**विषय : अंतिम सत्र/अंतिम वर्षातील अभ्यासक्रमांच्या परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांकरिता पुर्नपरीक्षांचे आयोजन करणेबाबत.**

अंतिम सत्र/अंतिम वर्षात शिकणा-या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येत आहेत. ऑनलाईन परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांना लॉगीन न होणे, इंग्रजी/मराठी माध्यमांच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध न होणे, सर्व्हर एरर, आकृत्या व सूत्रे न दिसणे, टेस्ट सबमिट न होणे, चुकीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होणे, समकक्ष विषयामुळे अथवा इतर कारणांमुळे विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा एकाच वेळी असणे, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी)/इतर शासकीय स्पर्धा परीक्षा इत्यादींचे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असणे, विद्यार्थ्यास स्वतःला कोव्हिड-१९ विषाणूची बाधा होणे, इत्यादी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये सदर तक्रारींबाबत चर्चा होऊन झालेल्या निर्णयानुसार ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने परीक्षेचा विकल्प निवडलेल्या व उपरोक्त उल्लेखित अडचणी आलेल्या **विद्यार्थ्यांच्या पुर्नपरीक्षा दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर, २०२० रोजी फक्त ऑनलाईन पध्दतीने** आयोजित करण्यात येत आहेत.

सदरची पुर्नपरीक्षेची सुविधा ही सर्व ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने झालेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, सदर पुर्नपरीक्षा ही **फक्त ऑनलाईन पध्दतीनेच** घेण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा व्यवस्थितरित्या व विना अडथळा पार पडलेली आहे, त्यांना पुर्नपरीक्षा देता येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा विकल्प निवडलेला होता अशा विद्यार्थ्यांकडे जर ऑनलाईन पुर्नपरीक्षा देण्यासाठी आवश्यक संगणक, लॅपटॉप, मोबाईल इत्यादी सुविधा उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात किंवा जवळच्या महाविद्यालयात पुर्नपरीक्षा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा वापर करुन पुर्नपरीक्षा द्यावी.

ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर ज्या विषयांची पुर्नपरीक्षा त्यांना देणे अपेक्षित आहे त्याबाबतचा तपशील/अधिकची माहिती दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२० पर्यंत पाठविली जाईल. ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, परंतु ज्यांना ऑनलाईन पुर्नपरीक्षेबाबत ई-मेल प्राप्त झालेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रात्री १२.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या वेबपोर्टलवरील उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी.

मा.प्राचार्य/संचालक, सर्व संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा विकल्प निवडलेल्या ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत अशा विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन पुर्नपरीक्षा देण्यासाठी आवश्यक संगणक, लॅपटॉप, मोबाईल इत्यादी सुविधा उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयामध्ये सदर सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सदर परिपत्रकाचा आशय आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावा व आपल्या महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी पुर्नपरीक्षेपासून वंचित राहू नये याची कृपया काळजी घ्यावी.

Display on NB & college website

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/४०३
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२०

31/10/2020

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/स्वायत्त संस्था

2020/10/31 13:24

# MCE Society's

Date: 31/10/2020

# ABEDA INAMDAR SENIOR COLLEGE CAMP, PUNE

## Examination Notice

**Regarding End Sem /Final Year examinations details As per Savitribai Phule Pune University Circular no 119/2020 dated 29/10/2020**

As per the meeting of examination and evaluation committee SPPU held on 28th October 2020 online re-examination of students **who missed examination due to technical difficulties** such as non-login, server error, failure to submit test etc. will be conducted on 05th,06th and 07th November 2020.

Please contact the College Examination Department for any query before 03rd November 2020.

**Note :-** Please read the circular carefully attached here,

Alam

**College Examination Officer**

Dr. AFTAB ALAM
College Examination Officer
Abeda Inamdar Sr. College, Pune-1.

Principal

PRINCIPAL
M.C.E. Society's
ABEDA INAMDAR SR. COLLEGE
Arts, Sci. & Comm, Camp, Pune-1.

2020/10/31 13:24